# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.५९४ दिनांक १८/०७/२०२०

## स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिट यांचे कडुन जुगार खेळणा-या ३४ आरोपीतांवर कारवाई करुन ११,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

-------ooooo-------

दिनांक १७/०७/२०२० रोजी ०४.०० वाजता वालीव पोलीस ठाणे हद्दीतील मालजीपाडागांवचे हददीत, मुंबई अहमदाबाद हायवे लगत, सनसाईन हॉटेलचे समोर वसई पुर्व ता.वसई जि.पालघर येथे आरोपीत क्रमांक १ ते ३४ यांनी तिन पत्ते जुगाराची साहीत्य आपल्या कब्जात बेकायदेशिररित्या बाळगुन स्वत:चे फायदयाकरीता तिन पत्ते नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना मिळुन आले तसेच आरोपीत यांनी मा.जिल्हाधीकारी यांचेकडील मनाई आदेशाचा भंग केला. आरोपीत यांचे ताब्यातुन ११,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द वालीव पोलीस ठाणे गु.र.नं.।। ६४०/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८, २६९ सह राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चा कलम- ५१ (ब) सह महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चे कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे सुचनेप्रमाणे श्री.रविंद्र नाईक, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे पालघर यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक, श्री. गर्जर यांनी व स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिट नेमणुकीतील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.